# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 295/2023 दिनांक : 01.08.2023

## 1)खुन :–

**उमरी :–** 26.07.2023 रोजी चे 16.00 वा. चे सुमारास, **मौ. कारला तांडा फिर्यादीच्या राहत्या घरासमोर ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे अविनाश शंकर चव्हाण, वय 35 वर्षे, रा. कारला तांडा ता. उमरी जि. नांदेड** यांचा यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून एका महिले सोबत प्रेमसंबध व सोबत पळुण जाणे या कारणावरून याचा मनात राग धरून ते पुन्हा गावी आल्यावर आरोपीतांनी मयताच्या पायावर कोयत्याने मारून जखमी केले. तसेच गुप्त अंगावर, पाठीवर, पायावर, छातीत दगडाने व रॉडने ठेचल्यामुळे अपचारा दरम्यान मृत्यु झाला. यातील नमुद चार आरोपीतांनी यातील व्यक्तीचा खुन केला. वगैरे **फिर्यादी सुभाष पी. शंकर चव्हाण, वय 41 वर्षे, व्यवसाय ड्रायव्हर रा. कारला तांडा ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 199/2023 कलम 302, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री कऱ्हे, मो.क्रं. 7798354377** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :–

**इतवारा :–**दिनांक 30.07.2023 रोजी चे 23.30 वा. चे सुमारास, **शनिमंदीर चौफाळा जवळ नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे खिशातील रियलमी 5 कंपणीचा किंमती 12,000/–रूपयाचा मोबाईल व नगदी 1800/–रूपये असा एकुण 13,800/–रू चा माल अज्ञात दोन आरोपीतांनी संगणमत करून चोरून नेला. वगैरे **फिर्यादी आनंत प्रकाश मेहरकर, वय 36 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. चौफाळा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 231/2023 कलम 392, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री आर. बी. चौधरी, मो.क्रं. 02462–236510** हे करीत आहेत.

## 3)घरफोडी :–

**1)शिवाजीनगर :–** दिनांक 29.07.2023 ते दि. 30.07.2023 चे रात्री 02.00 ते 03.00 वा. चे दरम्यान, **बिसेननगर नांदेड येथे,** यातील कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे राहाते फ्लॅटचे मेन गेटचे कुलूप तोडुन आत मध्ये प्रवेश करून कपाटाचे लॉक तोडुन लॉकरमध्ये ठेवलेले सोन्या–चांदीचे दागीने व नगदी 5000/–रूपये असा एकुण 67,000/–रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी आनंद हरिलाल गोकुळे, वय 40 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. गायकवाड गल्ली मुखेड ह. मु. तिरूपती अपार्टमेंट बिसेननगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 244/2023 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री घाटे, मो.क्रं. 7038833358** हे करीत आहेत.

**2)भोकर :–** दिनांक 27.07.2023 रोजी चे संध्याकाळी 04.00 ते दि. 29.07.2023 चे 10.00 वा. चे दरम्यान, **मौ. रिठा ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने मौ. रेनापुर येथील जि. प. प्रा. शाळेत ठेवलेले शैक्षणीक साहित्याचे दोन बॉक्स किंमती 8000/–रूपये व शाळेतील संगणक किंमती 8000/–रूपयाचे शाळेसमारील झेंडा लावण्याचा बांबु तोडुन एकुण 16,000/–रूपयाचे नुकसान केले. वगैरे **फिर्यादी विलास गंगाधरराव राऊत, वय 58 वर्षे, व्यवसाय मुख्याध्यापक जि. प. प्रा. शाळा रेणापुर ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरन 271/2023 कलम 454, 457, 427 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2820, मो.क्रं. 9823227195** हे करीत आहेत.

## 4)मो. सा. चोरी :–

**भाग्यनगर :–** दिनांक 28.07.2023 रोजी चे 08.00 ते 08.40 वा. चे दरम्यान, **देशी दारू दुकान रविराज नगर जंगमवाडी दुकानासमोर नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो स्पलेंडर कंपणीची मो. सा. क्रमांक एमएच–26/बीयु–0632 किंमती 40,000/–रूपयाची नमुद ठिकाणी कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी साहेबराव वामनराव भेरजे, वय 52 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. कुदळा ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 282/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2150 माळवे, मो. क्रं. 9970379878** हे करीत आहेत.

## 5)चोरी :—

**भाग्यनगर** :—दिनांक 31.07.2023 रोजी चे दुपारी 02.15 वा चे सुमारास, मिच्युअल फंड कार्यालया समोर श्रीनगर **नांदेड येथे,** यातील फिर्यादीने आपली स्कुटी मिच्युअल फंड कार्यालया समोर लावुन सीप करण्यासाठी गेला असता कोणतीरी अज्ञात चोरटयाने स्कुटीचे डिकीमध्ये ठवलेले 2,70,000/—रूपये अज्ञात दोन चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी कैलास चंपतराव भारसावडे, वय 42 वर्षे, व्यवसाय सेवानिवृत्त (आर्मी) मॅन रा. सुगांव ता. जि. ह. मु. ओमकारेश्वर नगर चैतन्यनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 283/2023 कलम 379, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री वाठोरे, मो.क्र. 8530487120** हे करीत आहेत.

## 6)बनावट नोटा बाळगल्या :—

**हदगाव** :— दिनांक 30.07.2023 चे रात्री 23.30 वा. चे सुमारास, **मौ. हदगांव ते नांदेड जाणारे रोड लगत राज पेट्रोल पंपावर ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने त्याचे ताब्यातील मो सा क्रमांक एमएच–26/सीसी–7697 हया मो सा मध्ये तीनसे रूपयाचे पेट्रोल टाकण्यास सांगुन पेट्रोल भरले व त्यांनी शंभर रूपये दराचे भारतीय चलनाचे नकली नोटा खऱ्या असल्याचे भासुन स्वतःचे फायदा करीता वापर केला व सदरील बनावट नोटा जवळ बाळगल्या. वगैरे **फिर्यादी दशरथ किसन मुनेश्वर, वय 27 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. बनचिंचोली ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरन 169/2023 कलम 489(ब), 489(सी), भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गायकवाड, मो.नं. 8308161089** हे करीत आहेत.

## 7)भारतीय हत्यार कायदा :—

**नांदेड ग्रामीण** :—दिनांक 31.07.2023 रोजी चे 15.15 वा. चे सुमारास, **उस्माननगर जाणारे रोडवर हनुमान मंदीराजवळ शाहुनगर वाघाळा नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक लोखंडी तलवार आणि खंजर बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/माधव नामदेव केंद्रे, ने. स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 556/2023 कलम 4/25, भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/173 माने, मो.क्र. 8788371187** हे करीत आहेत.

## 8)प्रोव्हिबीशन :—

**1)मनाठा** :— दिनांक 31.07.2023 रोजी चे 16.00 वा. चे सुमारास, **केदारनाथ जाणारे रोडवर मौ. गारगोटी तांडा ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभटीची गावठी दारू किंमती 1200/—रुपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी होमगार्ड/1739 मनोज परसराम परडे, वय 25 वर्ष, पोस्टे मनाठा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मनाठा** गुरनं 81/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2185 वडजे, मो.नं. 97028164990** हे करीत आहेत.

**2)मनाठा** :— दिनांक 31.07.2023 रोजी चे 16.30 वा. चे सुमारास, **मौ. बामणी तांडा ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभटीची गावठी दारू किंमती 1200/—रुपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी होमगार्ड/1045 सुरेश ज्ञानोबा नरोटे, वय 32 वर्ष, पोस्टे मनाठा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मनाठा** गुरनं 82/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2185 वडजे, मो.नं. 97028164990** हे करीत आहेत.

**3)मनाठा** :— दिनांक 31.07.2023 रोजी चे 15.30 वा. चे सुमारास, **सदभाव कंपणीचे जवळ बरड शेवाळा ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभटीची गावठी दारू किंमती 1200/—रुपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी होमगार्ड/2093, ब्रम्हानंद परसराम वाणी, वय 25 वर्ष, पोस्टे मनाठा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मनाठा** गुरनं 80/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2185 वडजे, मो.नं. 97028164990** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्रं. 296 / 2023  दिनांक : 01.08.2023**

पोलीस अधिक्षक कार्यालयात " **साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे** " यांची जयंती साजरी

1 ऑगष्ट, 2023 मंगळवार रोजी **"साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे"** यांची जयंती पोलीस अधिक्षक कार्यालयात पार पडली **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड, यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी **मा. श्री अबिनेश कुमार**, अपर पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्रीमती डॉ. अश्विनी जगताप**, पोलीस उप–अधिक्षक(मु) नांदेड, **मा. श्री. सुनिल निकाळजे**, पोनि नियंत्रण कक्ष, **मा. श्री नामदेव रिटे**, पोनि पोलीस कल्याण नांदेड, **श्री शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी नांदेड यांचे सह पोलीस अधिक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार तसेच मंत्रालयीन कर्मचारी हे सर्व उपस्थित राहुन **"साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे"** या महापुरूषांना अभिवादन केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन, **सपोउपनि सुर्यभान कागणे, पोहेकॉ / संजय सांगवीकर, मपोकॉ / शामका पवार, पोकॉ / विनोद भंडारे** यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड


नांदेड